## निशाणी क्र. ८० वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज ऋणको यांनी दाखल केला आहे. त्यांचे कथन असे आहे की, सदर प्रकरणात धनको यांनी निशाणी क्र.७१, ७३ व ७७ वर अर्ज दाखल केला. सदर अर्जांवर दिनांक १७.०६.२०२५ रोजी विना म्हणणे आदेश पारीत झाला. सदर विना म्हणणे आदेश रद्द करुन ऋणको यांना म्हणणे दाखल करण्यास परवानगी द्यावी. त्यामुळे खरी परिस्थिती न्यायालयासमोर येणार आहे. अर्ज नामंजुर झाल्यास, ऋणको यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे.

०२. धनको यांनी म्हणणे दाखल केले की, हिंदू विवाह अर्ज क्र.२५१/२०१६ मधील हुकुमनाम्यानुसार अर्जदार व अज्ञान मुलगा प्रसादची पोटगी वसुलीकरिता दरखास्त दाखल केली आहे. ऋणको यानी मा. उच्च न्यायालय रिट पिटीशन क्र.२९५९४/२०१९ मध्ये हफ्तेबंदी पुरसीस दाखल करुन सदर रक्कम भरण्याबाबत मान्य केले. असे असले तरी, दिनांक २७.०७.२०१८ पासून पोटगीची रक्कम भरणा केली नाही. निशाणी क्र.४८, ५१, ६४, ७१, ७७ वर वसुलीकरिता अर्ज दाखल आहे. ऋणको वाडवडिलार्जित जमिनी कसून उत्पन्न घेत आहे. तसेच, गट नं.४५१/२ मधील १६०० चौ.मी. सरकारने जमीन संपादीत केली असून, ॲवार्डची रक्कम ऋणकोचे वडील सुखदेव यांना देण्याबाबत आदेश पारीत केला आहे. त्याअनुषंगाने निशाणी क्र.६१ वर अर्ज दाखल केला आहे, सदर अर्ज प्रलंबित आहे. ऋणको यांनी थकीत पोटगी जमा केली नाही. अज्ञान प्रसाद शिक्षण घेत आहे. तरी, निशाणी क्र.४८, ५१, ६४, ७१ व ७७ वर थकीत पोटगीनुसार वसुलीकरिता जमीन जप्तीचा आदेश पारीत करणे आवश्यक आहे. तरी विना म्हणणे आदेश रद्द करुन, म्हणणे देण्याबाबत मागणी करत आहे. अर्ज कायदेशीर नाही. तरी, अर्ज नामंजुर करण्यात यावा.

०३. अभिलेखावरुन असे दिसून येते की, पोटगीची रक्कम वसूल होण्याकरिता दरखास्त दाखल केली आहे. दरम्यान, प्रकरण उच्च न्यायालयापर्यंत गेले, त्या ठिकाणी तथाकथित ऋणकोने पुरसीसद्वारे पोटगी देण्याबाबत मागणी केली, धनकोने वसुलीकरिता वरीलप्रमाणे अर्ज केला आहे व रक्कम वसूल करण्याकरिता जमीन जप्त करण्याबाबत मागणी करत आहेत. वरील सर्व परिस्थिती विचारात घेता, खालील अटीनुसार अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

०१. अर्ज रुपये ३००/– खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

०२. ऋणको यांनी धनको यांना खर्चाची रक्कम आज अगर पुढील तारखेस द्यावी, त्यानंतर म्हणणे दाखल करावे.

०३. तसेच, प्रस्तुत दरखास्तमध्ये धनको यांचे सर्व अर्ज व ऋणको यांचे म्हणणे एकत्रित विचारात घेऊन दरखास्तमध्ये निशाणी क्र.१ खालील एकत्रित आदेश पारीत करण्याकरिता प्रकरण ठेवण्यात यावे.

PRAMOD BHAGWAN LOKHANDE

Digitally signed by PRAMOD BHAGWAN LOKHANDE
Date: 2025.09.22 15:52:08 +0530

दिनांकः– २२.०९.२०२५

(प्र. भ. लोखंडे)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, बार्शी.

**<u>CERTIFICATE</u>**

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Shripad N. Chilka, Steno Grade-2. |
| Court | : Civil Court Senior Division, Barshi. |
| Judgment/Order signed by the P. O. on | : 22.09.2025 |
| Judgment / Order uploaded on | : 22.09.2025 |